**सरकारतर्फे सा.क्र. ३**

**शपथेवर**

माझे नांव : कानिफनाथ मच्छींद्र कर्डिले,
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती,
राहणार : सांगवी, ता.नेवासा, जि.अहमदनगर

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** –

१. दि.१५/११/२०२२ रोजी शिवाजी घुले यांच्या वस्तीवर पंचनाम्याकरीता बोलाविले होते. घटना ठिकाण हे शिवाजी घुले याने दाखवले होते. घटना ठिकाण हे शिवाजी घुले यांच्या घराच्या समोर होते. शिवाजी घ ुले यांच्या घराच्या पुर्व बाजुला काठी व विटाचा तुकडा पडलेला होता. पोलीसांनी ते ताब्यात घेवुन त्याचा पंचनामा तयार केला. तो मला वाचुन दाखविला व त्यावर माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५२** देण्यात येते. त्यावेळी माइयासोबत दुसरा पंच रामजी रमेश खंडागळे हा देखील होता. सदर पंचनामा साडे चार ते पाच च्या वेळेत करण्यात आला होता. पोलीसांनी माइयासमक्ष पंचनामा लिहीला. मला वाचुन दाखविला. घटनास्थळावरून जप्त केलेली काठी व विट पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला मटेरिअल ऑब्जेक्ट १ व २ दाखविण्यात आले. ही तीच काठी व विट आहे जे माइयासमक्ष घ टनास्थळावरून जप्त केले होते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. आर. बी. गव्हाणे यांचेमार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. मी शिवाजी घुले यांच्याच गावचा रहिवासी आहे व त्यांच्या घ राच्यासमोरून जाण्याचा माझा नेहमीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी घुले यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. साक्षीदार सांगतात की,

सगळयांना ओळखतो व सगळयांशी माझे चांगले संबंध आहेत. शिवाजी घ ुले यांनीच मला पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी शिवाजी घुले यांनीच काठी आणुन दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी जाण्या अगोदरच काठी व विट घटनास्थळी होती. ती काठी व विट शिवाजी घुले यांनीच घटनास्थळी आणली होती किंवा कसे ? हे मला सांगता येणार नाही. शिवाजी घुले यांचे घर शेताच्या कडेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घर शेताच्या कडेला असल्यामुळे तेथे ब—याच काठया पडलेल्या असतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या घरासमोर विटेचे भरपुर तुकडे पडले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे शिवाजी सोबत चांगले संबंध असल्यामुळे मी आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाण्या अगोदरच पोलीसांनी पंचनामा लिहुन ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

स्वाक्षरीत/—

(लीना अ. काळे)

दिनांक :०९/१०/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा